रविवार दि.१८ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३४९
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com




# मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा शानदार शुभारंभ

# बहिणींच्या आनंदसोहळ्यात मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री सहभागी

## लाडक्या भावाकडून रक्षाबंधानाची ओवाळणी मिळाल्याने महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण

## लाडक्या बहिणींच्या जीवनात सुखाचे-आनंदाचे क्षण यावे हीच या भावाची इच्छा-मुख्यमंत्री

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

महिलांच्या ढोल आणि लेझीम पथकाचे सादरीकरण, उत्सवाच्या वातावरणात सजलेला आणि महिला भगिनींनी फुललेला शिवछत्रपती क्रीडानगरीचा परिसर, महिलांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद आणि मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी महिलांना दिलेल्या शुभेच्छा अशा उत्साहपूर्ण वातावरणात 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'चा पुणे येथे राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला. महिलांच्या जीवनात सुखाचे, आनंदाचे दिवस यावे हीच भाऊ म्हणून प्रामाणिक इच्छा आहे आणि म्हणूनच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे बहिणींना दर महिन्याला दीड हजार रुपये माहेरचा अहेर मिळणार आहे, अशा भावपूर्ण शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या

म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडानगरी येथे झालेल्या या सोहळ्याला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महिला व बाल विकास मंत्री कु. आदिती तटकरे आदी उपस्थित होते.

आजचा दिवस लाडक्या बहिणींच्या आयुष्यातला आनंदाचा क्षण आहे असे नमूद करून मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून लाखो बहिणी मिळाल्या याचा मनापासून आनंद आहे. त्यांचे प्रेम ही जीवनातील मोठी शिदोरी आहे. या योजनेसाठी पूर्ण वर्षाचे आर्थिक नियोजन करण्यात आले आहे. या दीड हजार रुपयांचे मोल गरजू बहिणींसाठी खूप आहे. त्यांना या रकमेतून कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासोबत आर्थिक उन्नती साधता येईल. आता मदतीसाठी कुणासमोर हात फैलावे लागणार नाही.महिलांना योजनेचे अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्ट पर्यंत मुदत आहे. अर्ज भरल्यानंतर त्यांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याची एकत्रित रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल. काही महिलांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडले गेल्यानंतर त्यांच्या खात्यात रक्कम जमा होईल. प्रत्येक पात्र भगिनीला योजनेचा लाभ दिला जाईल. लाखो बहिणींच्या खात्यात दर महिन्याला निश्चित रक्कम जाईल याचे खूप समाधान आहे, अशा शब्दात श्री. शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

महिला भगिनींसाठी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेच्या माध्यमातून वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय घेतला. भावालाही मदत करण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली. सर्वांच्या जीवनात सुखाचे क्षण यावे यासाठी कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. जनतेची सेवा हेच शासनाचे ध्येय असून प्रत्येक योजना यादृष्टीनेच गतीने राबविण्यात येत आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

महिला लखपती झालेल्या बघण्याची, त्यांना आत्मसन्मान मिळवून देण्याची शासनाची इच्छा असून महिलांच्या विकासाच्या योजना राबविण्यासाठी हात आखडता घेतला जाणार नाही, बहिणींच्या हितासाठी शासन आवश्यक ते सर्व प्रकारचे प्रयत्न करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.राज्याच्या अर्थव्यवस्थेत महिलांची भागीदारी असावी असा केंद्र आणि महाराष्ट्र शासनाचा प्रयत्न आहे. यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्थाही वेगाने वाढणार असून महिलांचा सन्मान करणारा महाराष्ट्र घडवून दाखवू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी मार्च २०२५ पर्यंतची तरतूद केली असून पुढेही दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल, असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, आजचा हा सावित्रींच्या लेकींचा कार्यक्रम आहे. पुणे ही समाजकारणाची आणि परिवर्तनाची भूमी आहे. त्यामुळे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची सुरूवात पुण्यापासून केली जात आहे. हे सरकार बहिणींना लाभ देणारे सरकार आहे. १ कोटी ३ लाख महिलांच्या खात्यात योजनेचे पैसे कार्यक्रमापूर्वीच जमा झाले आहेत. ऑगस्टमध्ये ज्या महिलांच्या अर्जाची छानणी होईल, त्यांना जुलैपासूनच लाभ मिळेल. सप्टेंबरमध्ये ज्या महिलांच्या अर्जांची छानणी होईल, त्यांनाही जुलैपासूनच लाभ मिळेल. महिला आणि बालविकास मंत्री आदिती




तटकरे आणि सचिव अनुपकुमार यादव यांच्या नेतृत्वात अतिशय गतीने योजनेचा लाभ देण्याचे काम झाले आहे.

विकसित भारत करणे हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचे स्वप्न आहे. महिलांचा विकास झाला, तरच भारत विकसित होऊ शकतो असे प्रधानमंत्री कायम म्हणतात. त्यामुळेच केंद्र आणि राज्यात आम्ही स्त्रीकेंद्रित योजना सुरू केल्या. लखपती दिदी, लेक लाडकी, शिक्षण शुल्क माफी योजना आणि लाडकी बहीण योजना या दृष्टीकोनातूनच सुरू करण्यात आल्या गेल्या. राज्याच्या अर्थव्यवस्थेत महिलांची भागीदारी असावी, असा आमचा प्रयत्न आहे. ही योजना म्हणजे आम्ही महिलांप्रती व्यक्त केलेली कृतज्ञता आहे. ही रक्षाबंधनानिमित्त दिलेली ओवाळणी आहे. आईचं आणि बहिणीचं प्रेम जगातील कोणतीही संपत्ती विकत घेऊ शकत नाही. माझ्या माय माऊलीला पंधराशे रुपयांचे मोल समजते, असेही ते म्हणाले.उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, राज्यातील महिलांना अधिक सक्षम, सबल करण्यासाठी त्यांना मान, सन्मान प्रतिष्ठा मिळवून देण्याकरीता अर्थसंकल्पातमुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. या योजनेला माता-भागिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. आजपर्यंत १ कोटी ३ लाख रुपये माता-भागिनींच्या बँक खात्यात जुलै व ऑगस्ट महिन्याचे मिळून ३ हजार रुपये जमा करण्यात आले आहे. या महिलांच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान, हसू दिसून येत आहे. भाऊबीज सणानिमित्ताने ओवाळणी म्हणून भेट दिली आहे.

माता-भगिनी जीवन जगताना त्यांच्या आशा अपेक्षा असतात परंतु स्वतःचे हीत बाजूला ठेवून कुटुंबाच्या भल्याकरीता त्या काम करीत असतात. या योजनेच्या माध्यमातून त्यांच्या आशा- अपेक्षापूर्तीसाठी काम करण्यात येत आहे. यापुढेही या योजनेत सातत्य राहणार असून एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही, असे त्यांनी श्री. सांगितले.

राज्याच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुलींना मोफत व्यवसायिक शिक्षण अशा विविध योजना सुरू करण्यात आल्या आहेत. राज्याच्या हिताकरीता बेरोजगारी कमी करण्यासाठी, सर्व सामान्य नागरिकांचे जीवन सुखकर करण्यासाठी, मेट्रोचे जाळे निर्माण करण्यासाठी केंद्र व राज्य शासन मिळून काम करीत असून नागरिकांनीविकासकामांना सहकार्य करावे, असे आवाहन श्री. पवार म्हणाले.तीन दशकांच्या महिला धोरणाच्या इतिहासात या कार्यक्रमाच्या कार्यक्रमपत्रिकेत मान्यवरांच्या नावापुढे आईचे नाव लावल्याबद्दल समाधान व्यक्त करून विधान परिषद उपसभापती डॉ.गोऱ्हे म्हणाल्या, महिलांची संख्या निम्मी असून दोन तृतीयांश तास त्या काम करतात. जगातील १ टक्के संपत्ती महिलांच्या नावावर आहे. अशा स्थितीत या योजनेमुळे महिलांना निश्चितपणे दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रबोधनाची परंपरा आणि महिला विकासाचा वारसा असलेल्या पुण्यात या योजनेचा समारंभ होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंत्री कु.तटकरे यांनी केले. दोन दिवसांनी रक्षाबंधन साजरा होणार आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या तीन लाडक्या भावांनी आधीच ओवाळणी दिली. या योजनेला उदंड प्रतिसाद मिळाला. १ कोटी ३५ लक्ष महिला लाभासाठी पात्र ठरल्या, त्यापैकी १ कोटी ३ लक्ष महिलांच्या बँक खात्यावर रक्कम जमा करण्यात आली आहे. प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामसेवक आदींनी यासाठी खूप परिश्रम केले. २ कोटींपेक्षा अधिक महिलांना लाभ देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक विजेत्या स्वप्नील कुसळेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते महिला बचत गटांना मार्गदर्शन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'यशस्विनी प्लॅटफॉर्म' पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात योजनेच्या धनादेशाचे आणि स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, खासदार मेधा कुलकर्णी, सुनील तटकरे, श्रीरंग बारणे, आमदार प्रा. राम शिंदे, उमा खापरे, योगेश टिळेकर, प्रसाद लाड, दिलीप मोहिते पाटील, माधुरी मिसाळ, भिमराव तापकीर, राहुल कुल, महेश लांडगे, सिद्धार्थ शिरोळे, अश्विनी जगताप, सुनील कांबळे, सुनील शेळके, महिला व बालविकास सचिव अनुपकुमार यादव, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, क्रीडा आयुक्त डॉ.राजेश देशमुख, पुणे मनपा आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले, महिला व बालविकास आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त शेखर सिंह, एकात्मिक बालविकास योजना सेवा आयुक्त कैलास पगारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख आदी उपस्थित होते.

## आपले नाव मोठे होण्यासाठी प्रयत्न करू नये-बच्चू कडूंनी मुख्यमंत्र्यांना डिवचले

**मुंबई (वृत्तसंस्था)**-राजकीय लोकांनी संतांबाबत बोलताना योग्य माहिती घेऊन बोलले पाहिजे. जाणीवपूर्वक देशाहिताचे हित न पाहता मुद्दाम आपले नाव कसे मोठं होईल, अशा पद्धतीने हिणवण्याचा प्रयत्न करू नये, असे म्हणत प्रहारचे आमदार बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सल्ला दिला आहे. गेल्या २ दिवसांपासून राज्यात सरला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांनी केलेल्या विधानामुळे वातावरण तापले आहे. त्यातच नाशिकमध्ये एका सप्ताहाच्या कार्यक्रमात महंत रामगिरी महाराज आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे एकाच मंचावर बघायला मिळाले. यावेळी एकनाथ शिंदेंनी संतांच्या आशीर्वादामुळे राज्य कारभार सुरू आहे, असे विधान केले होते.

### चारोळी

**भाऊराया फार काही नको**
**माहेरच्या अंगणाची ओढ रे**
**तुझ्या प्रेमळ सावलीमुळे**
**सगळेच वाटे गोड रे.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

## बांगलादेशातील अल्पसंख्यांक हिंदू समाजावर होणाऱ्या अत्याचारा विरोधात पुकारलेला बंद शंभर टक्के यशस्वी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

नांदेड जिल्हातील सकल हिंदू समाजाकडून बांग्लादेशच्या हिंदू समाजावर होणाऱ्या अत्याचाराविरोधात पुकारलेल्या बंदला ११० संघटनांचा पाठींबा मिळाला असून नांदेड जिल्हात शंभर टक्के बंद यशस्वी झाला आहे.हिंदुवरील अत्याचाराविरोधात त्वरित कडक निर्णय घ्यावेत व हिंदू समाजाची सुरक्षा निश्चित करावी किंवा भारतामध्ये त्यांना प्रवेश देवून नागरीकत्व द्यावे.त्यांच्या मालमत्तेची मंदिरांची मोठ्या प्रमाणात तोड फोड करण्यात आली आहे.लहान मुलांची व पुरुषांची क्रुर हत्या केली गेली तसेच महिला व मुलींवर बलात्कार केले व त्यांचे अपहरण करण्यात आले आहे.हे त्वरित थांबले पाहिजे आम्ही सकल हिंदू या घटनेचा जाहीर निषेध करीत आहोत.व केंद्र शासनाने या सर्व घटनेला गांभीर्याने घेऊन या विषयावर कठोर पावले उचलावीत.नांदेड येथे ११० संघटनांनी पुकारलेला बंद शंभर टक्के यशस्वी झाला आहे.



## शिवसह्याद्री युवा मंच ओतूर ३२ वे रक्तदान शिबिर संपन्न

### १५० रक्तदात्यांचा सहभाग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मयूर ढोबळे । ओतूर**

शिवसाह्याद्री युवा मंच व चैतन्य हॉस्पिटल ओतूर यांच्या संयुक्त विद्यमाने १५ आगस्ट २०२४ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने ३२ वे रक्तदान शिबीर पार पडले. शिबिराचे उदघाटन ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री लहुजी ताठे यांच्या हस्ते पार पडले . प्रसंगी गावच्या सरपंच , उपसरपंच , जि . प सदस्य , पंचायत समितीचे सभापती , ग्रामपंचायतचे सर्व सदस्य आणि ओतूर गावातील राजकीय , सामाजिक , शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रातील मान्यवर उपस्तित होते . या रक्तदान शिबिरात सुमारे १५० रक्तदात्यांनी रक्तदान केले . प्रत्येक रक्तदात्यास शिवसह्याद्री युवा मंचाच्या वतीने एक भेट वस्तू देण्यात आली . रक्त संकलनाचे काम शिवनेरी रक्त पेढी , मंचर यांनी काम केले . हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसह्याद्री युवा मंचाचे सर्व सभासद यांनी परिश्रम घेतले आभार श्री गौरव डुंबरे यांनी मानले .

## बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराच्या निषेधार्थ कंधार येथे मोर्चा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

बांगलादेशमध्ये गृहयुद्धात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराचा निषेध करण्याकरिता कंधार, 'सकल हिंदू समाजा कडून बांग्लादेशा विरोधात निषेध मोर्चाकडून तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले

दि.१७ ऑगस्ट रोजी सकल हिंदू समाज कंधार च्या वतीने कंधार तहसीलवर निषेध मोर्चा काढन्यात आला या वेळी दिलेल्या निवेदनात बांगलादेशात अंतर्गत हिंसाचाराच्या अडून असंख्य हिंदूंची हत्या केली गेली,अमानुष अत्याचार, बलात्कार केले गेले,

हिंदू वरील अत्याचारा विरोधात त्वरित कडक निर्णय घ्यावेत हिंदू समाजाची सुरक्षा निश्चीत करावी किंवा भारतामध्ये त्यांना प्रवेश देवून नागरिकत्व दयावे त्याच्या मालमत्तेची मंदिराची मोठ्या प्रमाणात तोड-फोड करण्यात आली आहे, लहान मुलांची व पुरुषांची क्रुर हत्त्या केली गेली तसेच महिला व मुलींवर बलात्कार केले,त्यांचे अपहरण करण्यात आले आहे,हे त्वरित थांबले पाहिजे आम्ही सकल हिंदू समाज या घटनेचा जाहीर निषेध करीत,केंद्र शासनाने या सर्व घटनेला गांभींर्याने घेवुन या विषयी कठोर पाऊल उचलावे.

असे सकल हिंदू समाज कंधारच्या वतीने दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे,या विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते,

# इंदापूर महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम 'मला आय.ए.एस. व्हायचंय'

## हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त इंदापूर महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाचा स्पर्धा परीक्षेचा उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**





विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीकरिता असे उपक्रम महत्त्वपूर्ण आहेत असे मत प्राचार्य डॉ.जिवन सरवदे यांनी व्यक्त केले.राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष,माजी मंत्री व संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त इंदापूर येथील कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाच्या स्पर्धा परीक्षा आणि पोलीस भरती मार्गदर्शन केंद्राच्या वतीने विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या अनुषंगाने आयोजित 'मला आय.ए.एस. व्हायचंय 'या माध्यमातून स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.३०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कला शाखेवर आधारित,चालू घडामोडी,अंकगणित आणि बुद्धिमत्ता चाचणी,इतिहास,भूगोल, राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र, तसेच भाषा विषय या घटकावर भर देण्यात आला.प्राचार्य डॉ,जीवन सरवदे म्हणाले की,महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाचा हा अनोखा व अतिशय सुंदर असा उपक्रम आहे. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा संदर्भातील उजळणी तसेच त्याविषयीची सर्वांगीण माहिती उपलब्ध होण्यासाठी असे उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक करिअरसाठी महत्त्वपूर्ण ठरतात.' उपप्राचार्य प्रा.दत्तात्रय गोळे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचा वाढदिवस महाविद्यालयात अनेक उपक्रमाद्वारे साजरा करण्यात येतो.डॉ.शिवाजी वीर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी डॉ.भिमाजी भोर, प्रा.कल्पनाभोसले,प्रा.सुनील सावंत उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रोहिदास भांगे यांनी केले.आभार स्पर्धा परीक्षा समन्वयक प्रा. राजीव शिरसट यांनी मानले.

# उत्कृष्ट कर्मचारी;संग्राम बसवंते यांचा डॉ.सुधीर देशमुख यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार तालुक्यातील फुलवळ येथील भूमिपुत्र डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी, नांदेड येथे सूक्ष्मजीवशास्त्र विभागात प्रयोगशाळा तंत्रज्ञया पदावर कार्यरत असलेले संग्राम गोविंदराव बसवंते यांना उत्कृष्ट कर्मचारी म्हणून डॉ. सुधीर देशमुख अधिष्ठाता डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी, नांदेड यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे.


संग्राम गोविंदराव बसवंते हे गेल्या ३१ वर्षापासून या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सूक्ष्म जीवशास्त्र या विभागात प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदावर कार्यरत आहेत,बसवंते यांच्या उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन सन २०२४ या वर्षीचा उत्कृष्ट कर्मचारी म्हणून,प्रस्तुत महाविद्यालयाच्या वतीने भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दि.१५ ऑगस्ट २०२४ रोज गुरुवारी एका कार्यक्रमात डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांचे हस्ते संग्राम बसवंते यांना पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

याप्रसंगी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी,नांदेडचे सेवानिवृत्त अधिष्ठाता डॉ.पी.टी.जमदाडे, उपअधिष्ठाता डॉ. गोडबोले, वैद्यकीय अधीक्षक डॉ.वाय.एच. चव्हाण, सूक्ष्म जीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस.आर.मोरे यांच्यासह सूक्ष्म जीवशास्त्र विभाग,व रुग्णालयातील सर्व अधिकारी,कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या शहिदांचे स्मरण ठेवा–कामगार नेते रणखांब

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या क्रांतिकारक आणि महापुरुषांनी जे आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिलं जे देशासाठी शहीद झाले.त्या शहिदांचे स्मरण ठेवा त्यांचे विचार आत्मसात करा ही काळाची गरज असून आपल्याला स्वातंत्र्य फुकट मिळालेले नाही या स्वातंत्र्यासाठी शहिदांनी स्वतः चे बलिदान केले म्हणून तुम्ही आम्ही आज रोजी मुक्तपणे जिवन जगत आहोत. याचे भान असु द्या.आणी आपण सुद्धा देशसेवा साठी वेळ दिला पाहिजे.असे मोलाचे मार्गदर्शन कामगार नेते लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांनी व्यक्त केले..कलंबर महावितरण कार्यालयात १५ ऑगस्ट दिनी स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यालयात दुयम अभियंता संग्राम जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.ज्यानी देशासाठी बलिदान दिले त्या सर्वांना यावेळी अभिवादन करण्यात आले. यावेळी कामगार नेते विजय रणखांब, जहीर भाई सुधाकर शिरमवार, विलास टोकलवाड, अमोल बोधनकर,संतोष करेवाड, चंद्रकांत भालेराव, बालाजी गीते, दिलीप मरडे, टीबी तेलंगे, राखी भंडारे संदीप वडजे सलमान शेख , साई गीते नरेंद्र ताटे व इतर कर्मचारी बांधव उपस्थित होते.

# खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अमृत स्वायत्त संस्थेच्या विविध योजना



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चारठाणा । श्रीपाद जोशी**

येथील नरोत्तम प्राथमिक आश्रम शाळा..येथे खुल्या गटातील आर्थिक दुर्बल घटकांना मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी ( अमृत ) या स्वायत्त संस्थेच्या वतीने गुरुवार दिनांक १७ ऑगस्ट २०२४ बैठकीचे आयोजन करण्यात आले होती या बैठकीची प्रास्ताविक श्री. प्रदीप जी चक्रपाणी.यांनी केले.

संस्थेचे वक्ते श्री.भूषण धर्माधिकारी मुख्य मार्गदर्शक यांनी खुल्या गटातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल ( एथड ) जे तरुण व तरुणी आहेत यांना स्वयंरोजगार, कृषी उद्योग प्रशिक्षण,ड्रोण प्रशिक्षण, MPSC, UPSC, IIT, IIM, AIIMS, IIIT, IGTR कोर्स, C- DAC कोर्स, टंकलेखन, लघुलेखन, किशोरी विकास प्रकल्प, वैयक्तिक कर्ज व्याज, परशुराम गट व्याज परतावा योजना साठी अमृत संस्था मदतीसाठी तयार आहे, महाराष्ट्रातील अमृत संस्थेचे अनेक लाभार्थी मोठ्या स्वाभिमानाने व्यवसाय करीत आहे. ज्यांना परशुराम गटामध्ये बचत गटामार्फत व्यवसाय करावयाचा असेल यांनाही अमृत संस्था मदत करण्यास तयार आहे.उद्योग व्यवसाय करताना आपल्याला बँकेमार्फत कर्ज घ्यावे लागणार असून त्याच्या परतफेडसाठी जे व्याज होईल.त्या व्याजाची रक्कम (१२% ) पर्यंत अमृत संस्था देणार आहे. अमृत संस्थेच्या माध्यमातून ब्राह्मण समाजाने जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन श्री.दीपक जोशी विभागीय समन्वयक यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समन्वयक श्री.अनिरुध्द काटे यांनी विशेष परिश्रम घेतले. व अनिल देशपांडे यांनी आभार व्यक्त केले.या कार्यक्रमास अमृत लक्षित गटातील गणमान्य व्यक्ती व लाभार्थी चांगल्या संख्येने उपस्थित होते.

# सौरभ भोसले यांनी वाढदिवसा निमित्त केले प्राथमिक शाळेत खाऊ वाटप

## फळे आणि बिस्कीट वाटप केल्याने शाळा व्यवस्थापन समितीने केला सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**



खानवटे ता.दौंड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत येथील युवा कार्यकर्ते सौरभ भोसले यांनी फळे,बिस्कीट वाटून त्यांचा वाढदिवस साजरा केला.

त्यामुळे शाळेतील शिक्षक वृंद आणि शाळा व्यवस्थापन समिती यांनी त्यांचा शाल,श्रीफळ,फेटा बांधून सत्कार केला.

खाऊ वाटप केल्यामुळे त्यांचे आभार मानले. खाऊ वाटप केल्याने मुलांचा देखील आनंद द्विगुणीत झाला.शाळेचे मुख्याध्यापक बंडगर सर म्हणाले की गावातील युवकांनी सौरभ भोसले यांचा आदर्श घ्यावा,आणि प्राथमिक शाळेत गावातील प्रत्येकाने अशाप्रकारे सामाजिक उपक्रम राबवून मुलांना ऐक वेगळा आनंद मिळेल अश्या प्रकारे वाढदिवस साजरा करावा. यावेळी रामदास चव्हाण, मारुती ढवळे,गणेश लोखंडे,युवा उद्योजक सोमनाथ पतुरे आणि सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# जिजामाता प्राथमिक शाळा सेनगाव येथे७८वा स्वातंत्र्य दिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**




सेनगाव शहरातील जिजामाता प्राथमिक विद्यालयामध्ये ७८वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला जिजामाता प्राथमिक विद्यालयाकडू सकाळी सात वाजता सेनगाव शहरामध्ये प्रभात फेरी काढून भारत माता की जय, वंदे मातरम घोषणा देत प्रभात फेरी काढण्यात आली व ध्वजारोहण करण्यात आला त्यानंतर विद्यार्थ्यांनी भाषण व देशभक्तीपर गीते सादर केली शाळेच्या मुख्याध्यापक सुमित राठोड यांनी विद्यार्थ्यांचे मन भरून कौतुक केले यावेळी शाळेतील शिक्षक विद्यार्थी व प्रमुख पाहुणे उपस्थित होते विद्यार्थ्यांनी वेशभूषा धारण करून नागरिकांचे मन वेधून घेतले होते, यावेळी जिजामाता प्राथमिक विद्यालयाचे शिक्षक राठोड सर, पद्मे पाटील सर, दुकानदार सर, देशमुख सर, बेंबळे सर, जिलानी शेख सर, गजानन राठोड सर, चव्हाण सर, आकाश पवार सर, जाधव सर ,पेनुरकर सर व, आदी उपस्थित होते,,

# पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र व लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श प्राचार्य पुरस्कार व गुणवत्त विध्यार्थी सम्मान सोहळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । भारत वानरे**



काही माणसे ही आपल्या स्वकर्तृत्वाच्या बळावर, आपापल्या क्षेत्रामध्ये एक वेगळीच्च छाप निर्माण करीत असतात आणि अशा अनेक में माणसापैकी एक आदर्श व्यक्तीमत्व म्हणजे आपल्या महाविद्यालयाचे आदरणीय आचार्य, जे. कमलाकर श्रीपतराव कनसे हे आहेत त्यानी आपल्या दिड वर्षाच्या प्राचार्य पदाच्या । कालावधित उल्लेखनीय असे कार्य केले असून, त्यांच्या केलेल्या ल्या कार्याची दखल घेवूनच लाल बहादुर शास्त्री महाविद्यालयाचे माजी विधार्थी तथा दैनिक प्राप्ती टाईम्सचे संपादक व पत्रकार सेना संघ महाराष्ट्र राज्याचे प्रदेश उपाध्यक्ष मा श्री के पांडूरंग जी. कोटूरवार माजी विद्यार्थी बहादुर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद यांच्या संयुक्त विद्यमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य के कमलाकर श्रीपतराव कनसे यांचा आदर्श प्राचार्य म्हणून सन्मान करण्यासा तसेच इयत्ता बारवर्षीच्या बोर्ड परिक्षेत यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात करियर च्या संधी या विषयावर मार्गदर्शन अशा त्रिवेणी संगमाच्या कार्यक्रमाचे आयोजन १३ ऑगस्ट २०२४ रोजी येथे करण्यात आहे आहे. या सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने माननीय ना. याकार्यक्रमाचे अध्यक्ष धर्माबाद शिक्षण संस्थेचे संचालक श्री नागनाथ जी नोमूलवार तसेच प्रमुख मार्गदर्शक वक्ते म्हणून श्रीगोविंद मुंडकर, श्री जो प्रभाकर जाधव श्री. जी.पी. मिसाळे यांच्यासह इतर क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नांदेड जिल्ह्यातील अनेक जेस्ट पत्रकार व संपादकांची उपस्थिती आणि सत्कार समारंभ पार पाडण्यात आला.सर्वप्रथम विद्येची दैवत सरस्वती मातेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख मान्यवर म्हणून संस्थेचे संचालक श्री नागनाथ जी नोमूलवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर कनसे उपप्राचार्य डॉ. योगेश जोशी, ज्येष्ठ पत्रकार प्रा.गोविंद मुंडकर, जी.पी. मिसाळे, डॉ. प्रभाकर जाधव, उपप्राचार्य अमृतराव वानखेडे प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र प्रदेश महिला उपाध्यक्ष श्रीमती विजया काचावार, नांदेड जिल्हा उपाध्यक्ष श्री उध्दव मामडे,व्हाईस ऑफ मिडिया चे संजय कदम, पत्रकार सरंक्षण समिति चे नांदेड जिल्हाचे संघटक तथा साप्ताहिक इंद्रधनुष्य टाइम्स चे संपादक डॉ. सूधीर येलमे,धर्माबाद तालुका अध्यक्ष म.मुबशीर, उपाध्यक्ष चंद्रभिम हौजेकर, प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र नांदेड जिल्हा कार्या अध्यक्ष, भारत सोनकांबळे तसेच नांदेड जिल्हा व तालुक्यातील उपस्थित सर्व पत्रकारबधु स्वागत सत्कार करण्यात आला. तसेच लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय धर्माबादचे प्राचार्य डॉ. कमलाकर श्रीपतराव कनसे यांना प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने आदर्श प्राचार्य पुरस्कार – २०२४ पुरस्कार उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. महाविद्यालयाचे आदर्श माजी विद्यार्थी म्हणून प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पी.जी. कोटूरवार यांना पुरस्कार लाल बहादुर शास्त्री महाविद्यालयाचे संचालक व सर्व पदाधिकारी यांच्या हस्ते देण्यात आला. त्यानंतर सन २०२३–२०२४ या शैक्षणिक वर्षात इयता बारावी बोर्ड परिक्षेत घवघवीत यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थीत्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. त्यात इयत्ता १२वी चे विज्ञान शाखेचे कु. सारा फिरोज खान ९२.१७ टक्के घेवुन प्रथम स्थान तर कु. गंठोड मोनिका बालाजी ८९.५०द्वितीय स्थान इयत्ता १२वी शाखेचे कु. शेळगावे शेवाळे सुप्रिया गणपत हीने ६७ टकके घेवुन प्रथम स्थान तर कु. मंथेवाड गायत्री नागोराव हिने ६४ टकके घेवुन द्वितीय स्थान १२ वी चे वाणिज्य शाखेत कु. जोगदंड ऐश्वर्या प्रल्हाद – ९४.१७ टक्के प्रथम स्थान कु. धुप्पे ममताराणी अनिल – ९०.१७ द्वितीय घेवुन उत्तीर्ण झाल्याबदल या सर्व विद्यार्थ्यांचे प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने स्मृति चिन्ह देवुन सम्मान करण्यात आला. पत्रकारिता क्षेत्रात करियर मार्गदर्शन करण्यासाठी नांदेड जिल्हाचे प्रमुख वक्ता जेष्ठ पत्रकार प्रा. गोविंद मुंडकर यांचे संखोल मार्गदर्शन लाभले. तर धर्माबाद तालुक्यातील जेष्ठ पत्रकार जी.पी. मिसाळे यांनी अतिशय सुंदर असे मार्गदर्शन करत म्हणाले की आजचे सत्कारमूर्ती प्रा. डॉ. कमलाकर कनसे व हुतात्मा पानसरे हायस्कूल तथा लाल बहादुर शास्त्री महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी यांची प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्ष म्हणून निवड होवुन देशांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांच्या शपथग्रहन सोहळयाचे निमंत्रण प्राप्त होते. हे एक महाविद्यालय तसेच धर्माबाद तालुक्याचे गौरवच आहे. या त्रिवेणी कार्यक्रमाच्या प्रसंगी दैनिक प्राप्ती टाइम्स चे यशकिर्ती विशेषंकाचे लोकार्पण करण्यात आले. तसेच कार्यक्रमात महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक लोकनेता



# सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी प्रशासनाने तत्पर राहावे

## आ.शिंदे कुटुंबीय प्रशासनाच्या सदैव भक्कम पाठीशी ;सौ.आशाताई शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

७८ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त सामाजिक कार्यकर्त्या सौ .आशाताई श्यामसुंदर शिंदे व लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा युवा नेते विक्रांत पाटील शिंदे यांनी लोहा तहसील कार्यालयातील ध्वजावंदनास उपस्थित राहून राष्ट्रध्वजाला सलामी दिली यावेळी आशाताई शिंदे, विक्रांत पाटील शिंदे यांच्या हस्ते तालुक्यातील माजी सैनिकांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी आशाताई शिंदे व सभापती विक्रांत पाटील शिंदे यांनी सर्व नागरिकांना भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी लोहा पंचायत समिती कार्यालयाला नुकताच खडज मानांकन प्राप्त झाल्यामुळे आशाताई व विक्रांत शिंदे यांनी पंचायत समिती कार्यालयाची पाहणी करून आनंद व्यक्त करत लोहा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डि .के.आडेराघो व कार्यालयीन प्रशासन अधिकारी सतीश चोरमले, कनिष्ठ कार्यालयीन प्रशासन अधिकारी प्रियदर्शन वाघमारे व सर्व पंचायत समिती टीमचे कौतुक करून चोरमले व प्रियदर्शन वाघमारे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला, यावेळी आशाताई शिंदे बोलताना म्हणाल्या की, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मेहनतीमुळे लोहा कंधार मतदारसंघातील लोहा पंचायत समितीला आय.एस.ओ मानांकन मिळाल्यामुळे मतदारसंघाची मान उंचावली असून सर्व विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी सदैव प्रयत्नशील राहावे आमदार शिंदे कुटुंबीय प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे यावेळी बोलताना आशाताई शिंदे यांनी सांगितले, यावेळी तहसीलदार विठ्ठल परळीकर यांना आशाताई शिंदे व सभापती विक्रांत शिंदे यांनी ई पीक पाहणी रद्द करून सरसकट शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याची मागणी करण्यात आली यावेळी तहसीलदार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला, यावेळी उपसभापती श्याम अण्णा पवार, समन्वय समिती सदस्य सिद्धू वडजे, बोरगावचे सरपंच प्रतिनिधी पुंडलिक बोरगावकर, बाजार समितीच्या संचालिका पूनमताई क्षिरसागर, चेअरमन नागेश हिलाल, संचालक सुधाकर सातपुते, संजय गांधी निराधार योजना समिती सदस्य अशोक सोनकांबळे, व्यंकटी आढाव, अजय हंकारे, भरत गायकवाड, प्रसाद जाधव, अमोल गोरे , माजी नगरसेविका पुष्पलता कापुरे सह कार्यकर्ते, पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.



# मदरसा म्हणजे उद्याचा संक्षम नागरिक घडविण्याचा कारखाना–गणेश कवडे

## मदरसा जामिया इस्लामिया बहरूल उलुम येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

अनेक वेळा मदरस्यामध्ये नेमकं चालतंय काय या वर अनेक प्रश्न उपस्थित केले जातात या वर आम्ही ही निरुत्तर होत होतो. मात्र आज जेव्हा मदरस्यात आलो व येथील परिस्थिती पाहिली तर येथे आंतकवादी नाही तर उद्याचा संक्षम नागरिक घडविला जात असून दर वेळेस मुस्लिम समाजालाच आम्ही किती देशभक्त आहोत हे सिध्द करावे लागते हि खुप मोठी शोकांतिका आहे. जे इंग्रज सरकारने फोडा आणि राज्य करा याचे अवलंब केले तेच मानसिकतेतुन काही संघटना समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्या विचारांना आम्ही फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांने मात केल्या शिवाय राहणार नाही. असे प्रतिपादन युवा नेते गणेश कवडे यांनी केले. मदरसा जामिया इस्लामिया बहरूल उलुम येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



भारत देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिन पाटोदा शहरातील मदरसा जामीया इस्लामिया बहरूल उलुम येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने लहान मुलांनी एकांकी नाटक, नात, मराठी, इंग्रजी भाषेत भाषणे केली. या आणी चाचणी परिक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. प्रथम सकाळी ठिक-०८:०० वाजता पाटोदा मरकजचे आमीर सहाब शेख अमानुल्ला सहाब व पुणे येथील जावेद सहाब यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाला पाटोदा शहरातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.ध्वजारोहणानंतर मदरस्यामधील विद्यार्थ्यांनी देशभक्ती पर भाषणे व लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी मतदान किती आवश्यक आहे या वर एकांकी नाटक सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या वेळी मुफ्ती जफर सहाब यांनी इंग्रज काळात देवबंदच्या माध्यमातून उलेमा इकराम यांनी कसे भारत देशाच्या स्वातंत्र्यांसाठी त्याग, बलीदान दिले या वर प्रकाश टाकला तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित पुणे येथील जावेद सहाब यांनी मदरस्यामध्ये मराठी, इंग्रजी, गणित विषयांचे शिक्षण देणारे प्रा.सचिन गायकवाड सर व अमजद सर, सलिम सर यांचे कौतुक करत म्हणाले की मी अनेक ठिकाणी गेलो मात्र येथील विद्यार्थ्यांचे मराठी असो किंवा इंग्रजी भाषेचा उच्चाराचा दर्जा उत्तम दिसून येत असल्याने शिक्षक विद्यार्थी घडविण्यासाठी मोठे परिश्रम घेत आहेत हे सिद्ध होत आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मौलाना अब्दुल मौइज, मौलाना मजहर, मौलाना अरबाज, चांदखान पठाण, अमजद पठाण, आयुब मोमीन, फखरूद्दीन भाई सह आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन मौलाना जहुर यांनी केले. तर आमीर अमानुल्ला सहाब यांच्या दुवाने कार्यक्रम संपन्न झाला.

# प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये स्वातंत्र्य दिन सोहळा साजरा




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरातील प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव उपक्रमा अंतर्गत हर घर तिरंगा हा उपक्रम मोरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १३ ते १५ ऑगस्ट २०२४ या तीन दिवस ध्वजारोहण करून तसेच शाळेमध्ये तिरंगा रॅली, तिरंगा ध्वज चित्रकला, विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धा, विद्यार्थ्यांना पॅड वाटप, खाऊ वाटप अशा उत्साह पूर्ण उपक्रमांनी साजरा करण्यात आला या मध्ये दिनांक १३ या दिवशी मुख्याध्यापक मोरे सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर तिरंगा ध्वज हातात घेऊन खेळ स्पर्धा घेण्यात आल्या, त्याच बरोबर तिरंगा ध्वज चित्र काढून रंगवणे हा उपक्रम राबवण्यात आला. दिनांक १४ रोजी ध्वजारोहणानंतर पाटोदा शहरातून तिरंगा रॅली काढण्यात आली या मध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी सहभागी झाले तसेच दिनांक १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी शाळेत सकाळी ध्वजारोहण श्री.नागरगोजे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले तसेच या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून अतुलरावजी घोलप, नामदेव शिंदे हे उपस्थित होते, तसेच माता-पालक चापकानडे ताई, जोगदंड ताई, तांबे ताई, वाघमारे ताई, गायके ताई, राजपुरे ताई यांची उपस्थिती होती. आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत तिरंगा ध्वज देऊन करण्यात आले, सकाळी ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभात फेरी नंतर देशभक्तीपर विषयावर वकृत स्पर्धा घेण्यात आली, या नंतर विद्यार्थ्यांना संस्थेचे प्रमुख डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या वतीने पॅड वाटप करण्यात आले. या वेळी आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी आपले विचार व्यक्त करताना भारतीय स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या महामानवांच्या जीवन चरित्राबद्दल विचार व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक मोरे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महामानवा चे चरित्र आत्मसात करावे या बाबत मार्गदर्शन केले. या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.माताडे सर यांनी केले, तर आभार श्रीमती शेलार मॅडम यांनी मानले. शेवटी पॅड वाटपानंतर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पुष्पावती विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मयूर ढोबळे । डिंगोरे**

ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित पुष्पावती विद्यालय डिंगोरे येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न झाल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी दिली . ध्वजारोहण पिंपळगाव जोगा डिंगोरे गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य अंकुश आमले व माजी सैनिक चंद्रकांत मवाळ यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यानिमित्ताने गावच्या सरपंच सीमा सोनवणे माजी जिल्हा परिषद सदस्य बबन तांबे माजी सैनिक अहिलु नाना लोहोटे, सुनील उकिरडे, दत्तात्रय उकिरडे, गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामपंचायत डिंगोरेचे सर्व सदस्य, विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यानिमित्ताने संदेश पर भाषणात अंकुश आमले म्हणाले की आजच्या विज्ञान युगात भारताने सर्व क्षेत्रांमध्ये प्रचंड प्रगती केली आहे परंतु सध्या भारतासमोर लोकसंख्या वाढ व ग्लोबल वार्मिंग ह्या दोन मोठ्या समस्या भेडसावत आहेत. पृथ्वीचे तापमान वाढत असून त्यावर नियंत्रण आनण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण करणे गरजेचे आहे त्यासाठी वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करावे. सर्वांनी पुढाकार घेऊन समस्या दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल शितोळे यांनी, तर नियोजन विजय काकडे यांनी केले.



# अंगणवाडी ताईंनी आपल्या लाडक्या भावाला राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर । विनायक कुटे**

लोणार तहसील कार्यालय येथे आज दिनांक १७ ऑगस्ट रोजी अंगणवाडी ताईंनी आपला लाडका भाऊ मेहकर विधानसभा मतदार संघाचे लाडके आमदार श्री संजय रायमुलकर यांना राखी बांधून रक्षाबंधन हा सण साजरा केला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती लोणार चे सभापती माननीय बळीरामजी मापारी, तहसीलदार भूषण पाटील, महिला संरक्षण अधिकारी सीमा खणपटे, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी अश्विनी ठाकरे, पर्यवेक्षिका भिकाबाई सानप,मंगला निकस, उज्वला शिंगणे, विद्या नव्हाळे तसेच अंगणवाडी सेविका शोभा भोकरे, पुष्पा बनकर, नंदा बच्छीरे, संगीता मोरे,अंजली परिहार,सत्यशीला टकले, दुर्गा भानापुरेसह उपस्थित होत्या. रक्षाबंधनाची भेट म्हणून शासनाकडे अंगणवाडी सेविका यांना २०००० प्रति महिना मानधन लागू करण्यासाठी आपण शासनाकडे पाठपुरावा करावा अशी मागणी आपला लाडका भाऊ आमदार डॉ संजय रायमुलकर यांच्याकडे केली आहे.

# दिपभारती विद्यालयात आनंददायी खाद्य मेळाव्याचे आयोजन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

दिपभारती विद्यालयात आनंददायी खाद्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते ,कार्यक्रमाचे उद्धाटन शाळेचे मुख्याध्यापक श्री वाय . एस . गवळी यांच्या हस्ते करण्यात आले त्यामध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून त्यांची विक्री केली , विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे खाद्यपदार्थ खरेदी करून त्यांचा आस्वाद घेतला . कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले .

# वसतीगृहात स.पो.नि.चंद्रकांत पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

उस्माननगर येथील जवाहरलाल नेहरू विध्यार्थी वसतिगृहात ७७ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथम मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पुजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर उस्माननगर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार यांच्या हस्ते तिरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण झाल्यानंतर बालवैज्ञानिक सम्यक लक्ष्मण कांबळे यांचा सपोनि चंद्रकांत पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला.सत्कार झाल्यानंतर सम्यक कांबळे यांनी ( ड्रायव्हर) चालकांच्या झोपीमुळे होणारे आपघात टाळण्यासाठी यंत्र तयार केले त्या यंत्राची सविस्तर माहिती मान्यवरांना सांगितली .यावेळी उस्माननगर पोलीस स्टेशन चे पोलीस उपनिरीक्षक गजानन गाडेकर , माजी सरपंच तु.श.वारकड गुरूजी ,सामाजिक कार्यकर्ते रामराव सोनसळे ,सरपंच शोभाबाई शेषेराव काळम, ग्रामसेविका सौ.डी.शिंदे - माने ,तलाठी के.के.पाटील , जेष्ठ नागरिक विठ्ठलराव वारकड ,सोसायटीचे चेअरमन संजय वारकड ,पोलीस पाटील विश्वभंर मोरे ,प्राध्यापक विजय भिसे ,चांदोबा लोकडे , भारतीय सैनिक योगेश कांबळे ,वैजनाथ पाटील घोरबांड ,शेषेराव पाटील काळम, बालाजी पू.घोरबांड ,काजी साहेब, माधव भिसे ,राजू संभाजी, सोनटक्के ,सुखदेव सोनटक्के ,आनंदराव पाटील घोरबांड, संभाजी काळम , गंगाधर भिसे ,गंगाधर कांबळे ,संदिप घोरबांड, पोलीस कर्मचारी अनिरूद्ध वाडे ,माधव घोरबांड ,पत्रकार सुर्यकांत मालीपाटील ,प्रदीप देशमुख ,लक्ष्मण भिसे ,गणेश लोखंडे ,वसतिगृहातील अधीक्षक लक्ष्मण कांबळे ,कर्मचारी विद्यार्थी व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.



# दीपभारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

दीप भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय माहोरा या शाळेचे कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान प्रशालेचे मुख्याध्यापक श्री पांडे सर, प्रमुख पाहुणे म्हणून माहोरा नगरीचे सरपंच गजानन पाटील लहाने, ज्येष्ठ भाजप नेते भगवानराव लहाने, सुरेश कुमार बोरसे बजरंग, प्रभाकर नाना शहागडकर, माजी उपसरपंच भानदास बोर्डे, दादाराव गडकरी सामाजिक कार्यकर्ते, भास्कर सोनवणे ग्रा. पं. सदस्य, ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब गवले, राजू भाऊ गोवरकर, भगवान वाघ व आदी मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमात शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी व शाळेतील मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमात सोहेल सुभान पठाण विभागीय स्पर्धेमध्ये येऊन महाराष्ट्र स्पर्धेमध्ये यशस्वी झाला. आशा विद्यार्थ्याला शाळेचे मुख्याध्यापक व सरपंच यांनी त्याचे स्वागत करून त्याच प्रमाणपत्र दिले.



# मा.आ.भिमराव धोंडे यांची शिरापुर येथे बैलगाडीतून मिरवणूक तर धानोरा येथे जेसीबीतुन फुलांची उधळण


लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

जनसंपर्क अभियान दौऱ्यांच्या निमित्ताने आष्टी तालुक्यातील शिरापुर येथे आकर्षक रित्या सजविलेल्या बैलगाडीतून मिरवणूक तर धानोरा येथे जेसीबीतुन फुलांची उधळण करीत स्वागत आले,पिंपरखेड येथे ट्रॅक्टर चालवत कार्यकर्त्यांनी मिरवणूक काढली.तर दादेगाव येथे मा. आ.भिमराव धोंडे यांची वाजतगाजत घोड्यावरून मिरवणूक काढण्यात आली. तसेच डोंगरगण येथेही फटाक्यांची आतषबाजी करून स्वागत करण्यात आले. प्रत्येक गावांमध्ये फटाके व तोफांची सलामी देत भिमराव धोंडे यांचे धानोरा गटात जोरदार स्वागत करण्यात आले.

आष्टी विधानसभा मतदारसंघातील सर्व सामान्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी माजी आ. भीमराव धोंडे यांनी शुक्रवारी दिनांक १६ ऑगस्ट रोजी जनसंपर्क अभियाना अंतर्गत आष्टी तालुक्यातील धानोरा, दादेगाव व परिसरातील वाड्या वस्त्यांचा दौरा केला.धानोरा येथील तिरमल वस्ती व गव्हाणे वस्ती,साबलखेड,शिरापुर, चिंचोली एकशिंगे,पिंपरखेड,कन्हेरवाडी, भोजेवाडी,कोकरे वाडी,कोल्हे वाडी,देवकाते वाघमोडे वस्ती, महादेव वाडी,सुरनरवाडी,भिल्ल वस्ती,दादेगाव कॅंप,दादेगाव, डोंगरगण या गावाचा दौरा केला.

विविध ठिकाणी बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की,शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून मी पुढच्या अनेक पिढ्यांसाठी काम करुन ठेवले,मी विधानसभा सदस्य असताना मतदारसंघात रस्ते विकास,सिंचनाची कामे करुन ठेवली आहे तर इतरांनी मतदारसंघातील जनतेकरिता भविष्यासाठी काय केले असा सवाल उपस्थित करीत उर्वरित विकासकामे करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन माजी आमदार भिमराव धोंडे यांनी केले.शिरापुर येथे बोलताना सांगितले की,बऱ्याच दिवसानंतर मला बैलगाडीत बसण्याचा योग आला.साबलखेड येथे शाळेची इमारत चांगली आहे तेथे आय.टी.आय.सुरू करु असे सांगितले.धानोरा येथील कै.शेख मैनुद्दीन व कै.भगवान एकशिंगे हे कार्यकर्ते कायम स्मरणात राहतील असे सांगितले.दौऱ्याच्या निमित्ताने हौसराव जगताप,अब्दुल सय्यद, दिनकर गव्हाणे,शहाजी मारुती चव्हाण यांच्या निवासस्थानी भेटी दिल्या. दौऱ्यामध्ये भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजयदादा धोंडे, माजी सरपंच झुंबर चव्हाण, तुकाराम चव्हाण,पोपट जाधवर, व इतर कार्यकर्ते सोबत होते. भोजेवाडी येथील शिवाजी पालवे व हिवरा येथील अपेक्षा सुदाम चव्हाण यांची पोलीस दलात निवड झाली त्याबद्दल तिचा माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.राखी पौर्णिमेच्या निमित्ताने ठिकठिकाणी लाडक्या बहिणीनी भिमराव धोंडे यांचे औक्षण करून राख्या बांधल्या. पिंपरखेड येथे पारधी समाजाकडून फुलांची उधळण करीत भिमराव धोंडे यांचे स्वागत करण्यात आले.साबलखेड येथील साबळे वस्तीवर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



वेगवेगळ्या ठिकाणी युवा नेते अजयदादा धोंडे,आदर्श शिक्षक नवनाथ गाडे,उपप्राचार्य भास्कर चव्हाण,उपसरपंच चांगदेव एकशिंगे,विकास एकशिंगे,माजी सरपंच भगवान काळे,सेवानिवृत्त स.पो.नि.गोरख शेळके,नवनाथ पाटील,नामदेव शेळके,गंगाधर बोराटे,सावनकुमार तागड, शिवाजी गोफणे,संदीप नागरगोजे,सुभाष नागरगोजे यांनी मनोगत व्यक्त केले.

पिंपरखेड येथील गर्जे वस्तीवरील महादेव गर्जे यांचे निधन झाले होते त्यांच्या कुटुंबियाची सांत्वन करण्यांत आले. ठिकठिकाणी माजी सभापती विजयकुमार बांदल,सरपंच सोमनाथ गायकवाड,माजी सरपंच झुंबर चव्हाण,नवनाथ गाडे,माजी सरपंच डिगांबर साबळे,शिरीष थोरवे, सोपान गाडे,सरपंच माऊली वाघ,बाबासाहेब बळे, गजानन देसाई,आबासाहेब जाधव,गोरख गाडे,एकनाथ जाधव,बजरंग देसाई,भाऊसाहेब साबळे,नारायण साबळे,बाबुराव दातीर,किरण तागड,विष्णूपंत चौरे,बाबुराव तागड,नाथा वाघमोडे,गहिनीनाथ तागड,उपसरपंच अनील गायकवाड,सरपंच सुभाष शेळके,भाऊसाहेब पोटे, उपसरपंच राम शेळके,बाजीराव गोफणे,आनंदराव कापरे,बापुराव दातीर,नरहरी तागड,बंडू तागड,सरपंच हनुमंत आडागळे,सिताराम झांजे, उपसरपंच चांगदेव एकशिंगे,दत्तू शेळके,माजी सरपंच बाबासाहेब एकशिंगे,आजिनाथ कौचाळे, सरपंच भाऊसाहेब कोकरे, दत्तोबा शिंद,कृष्णा देवा,दिपक गोल्हार,भगवान कोकरे लक्ष्मण कोकरे,माणिकराव कोकरे, विठोबा विधाते,गोपिनाथराव विधाते,बालाजी थोरवे,माजी सरपंच बिभिषण कवडे,केशव महाराज,भाऊसाहेब लांडगे,दादा गवळी,बापुराव धारक, फारुकभाई,पै.अनिस सय्यद, माजी उपसरपंच सदाशिव कन्हेरकर,अभय गर्जे,उपसरपंच परमेश्वर कर्डिले,मच्छिंद्र शेळके, दादासाहेब शेळके,दादासाहेब जगताप भिमराव चव्हाण, संतोष चव्हाण,तुकाराम चव्हाण, ज्ञानदेव चव्हाण,दिनकर गव्हाणे, गोरख ओव्हाळ,राजेंद्र ओव्हाळ, भारत चव्हाण,पंढरीनाथ ओव्हाळ,किशोर ओव्हाळ,धुळाजी लकडे,संजय पारखे,संजय काळे,कुंडलिक कोल्हे,सिताराम वाघुले,नामदेव रणसिंग,बबन सुरनर,नामदेव बडे,उपसरपंच भरत विधाते,बबनराव जाधवर , आण्णासाहेब विधाते,नेहरु वाघुले,संजय बंडाले,बबन वाघुले,दिपक बंडाले,मुरलीधर मुळे,उस्मान भाई व इतर कार्यकर्ते वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमास उपस्थित होते.

# भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७८वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**



भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७८ वा वर्धापन दिन उमरखेड शहरात उत्साहात साजरा करण्यात आला. तहसिल कार्यलयाच्या पटांगणात आयोजित (जुने उर्ध्व पैनगंगा प्रकल्प कार्यालय) मुख्य कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे , यांनी ध्वजारोहण केले. या नंतर पोलिस निरीक्षक निलेश सरदार पी एस आय सागर इंगळे यांच्या मार्गदर्शनात पोलिस विभागाने उपविभागीय अधिकारी यांना मानवंदना दिली. ध्वजारोहणा नंतर उमरखेड तालुक्यातील रास्त भाव धान्य दुकानदार यांना उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे ,मा. आ. नामदेवराव ससाने उमरखेड तहसिलदार आर यु सुरडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमान गायकवाड,न.प. मुख्य कार्यकारी अधिकारी महेश जामनोर त्यांच्या हस्ते आय एस ओ नामांकन प्रमाणपत्र देण्यात आले. ध्वजारोहणाच्या मुख्य शासकिय सोहळ्याला आमदार नामदेवराव ससाने , उमरखेड तहसिलदार आर यु सुरडकर,मुख्य कार्यकारी अधिकारी महेश जामनोर, उमरखेड उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड , ,नायब तहसिलदार एम डी नकितवाड, नायब तहसिलदार एस. डी. पाईकराव ,नायब तहसिलदार , आर एम पंधरे , माजी आमदार विजयराव खडसे ,नितीन भुतडा साहेबराव कांबळे, नाझर ऐनवाड, गणपत तिडके, अक्षय बोंडगुलवार, दीपक चव्हाण, सोळंके, गाडेकर, स्वंतत्र संग्राम सैनिक न.प. सदस्य प्रतिष्ठीत नागरिक , पत्रकार, तलाठी, तसेच विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# दिपभारती विद्यालय दानापूर येथे स्वातंत्र्य दिन साजरा


लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

दिपभारती विद्यालय दानापूर येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री वाय एस गवळी यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले ,गावातून प्रभात फेरी काढण्यात आली .विद्यार्थिनींनी लेझिम ,सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले .तसेच शाळेचा माजी विद्यार्थी कडुबा दांडगे यांची पवित्र पोर्टल मार्फत जिल्हा परिषद शिक्षक पदी निवड झाल्याबद्दल शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच गीता मोकाशे ,वैष्णवी नऱ्हेराव, अक्षय दगडघाटे या विद्यार्थ्यांनी संगणक परीक्षेत घवघवीत यश मिळवल्याबद्दल शाळेच्या वतीने त्यांचाही सत्कार करण्यात आला .याप्रसंगी पत्रकार जफर गनी शेख , गावातील प्रतिष्ठित नागरिक जनार्दन दळवी ,सुरेश कणगरे,शेख अब्दुल रहीम , माजी सरपंच भगवानराव दळवी व शाळेचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती .



**भोकर तालुक्यात विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन सोहळ्यात नांदेड जिल्हाचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या सोबत चर्चा करतेवेळी शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी फिक्स आमदार नायगाव विधानसभा.**



# साप्ताहिक बीड सिटी सिटी लाईफचा दुसरा वर्धापन दिन व कार्यालयाचा उद्घाटन उत्साहात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । प्रतिनिधी**

साप्ताहिक बीड सिटी लाईफ या निर्भीड वृत्तपत्राच्या दुसऱ्या वर्धापनदिनानिमित्त व कार्यालयाच्या उद्घाटनानिमित्त उपस्थित वाचकांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. प्रत्यक्ष भेटून, फोनद्वारे आणि सोशल मिडियावर दिवसभर शुभेच्छा व्यक्त केल्या. इतरांपेक्षा हटके लेखणी, विविध विषयाचे वृत्तांकन, वस्तुनिष्ठ आणि सर्वात हटक्या बातम्या प्रसिद्ध करण्याची खासियत यामुळे सर्वच वयोगटातील वाचकांची सा.बीड सिटी लाईफ वर पसंतीची मोहोर उमटली. लोकप्रतिनिधी, सरकारी अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थेतील सदस्य, सामाजिक, पर्यावरण, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रातील पदाधिकारी, विविध संस्था, संघटनांचे विश्वस्त, सरकारी अधिकारी-कर्मचारी, प्राध्यापक-शिक्षकांनी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. सा.बीड सिटी लाईफ ने दिनांक १५ ऑगस्ट रोजी करीत आपला दुसरा वर्धापन दिन साजरा करीत यशस्वीपणे तिसऱ्या वर्षांत पदार्पण केले आहे. तसेच तिसऱ्या वर्षांत पाऊल ठेवत कार्यालयाचे नियोजन करून त्यानिमित्त कार्यालयाचे उद्घाटन गेवराई चे तहसीलदार संदीप खोमणे यांच्या हस्ते करण्यात आले आहे. सा. बीड सिटी लाईफ वर प्रेम करणाऱ्या हितचिंतकांनी तसेच विविध क्षेत्रातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, उद्योग क्षेत्रातील मान्यवरांसह वाचक, हितचिंतकांनी हजेरी लावत शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

यानिमित्त माजीमंत्री बदामराव पंडित यांनी सा.बीड सिटी लाईफ तिसऱ्या वर्षांत पदार्पण होत असून



ग्रामीण भागातून येवून गेवराई शहरात जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी कार्यालयाचे झाले ही अभिमानाची गोष्ट आहे. असे संपादक शेख आमीन, उपसंपादक नवनाथ आडे, सहसंपादक सय्यद बादशहा यांना शुभेच्छा दिल्या.

समाज जीवनाशी निगडीत असणारे साप्ताहिक वृत्तपत्र म्हणून लोकप्रिय झाले असून, व निर्भीड लेखणीतून समाज जीवनाचे अंक बनले आहे. मी बीड सिटी लाईफ चा वाचक आहे. गेवराई तालुक्यातील युवकांचे प्रेरणास्थान रणवीर पंडित यांनी वस्तुनिष्ठ, वेधक, सत्यप्रमाणित, निर्हेतूक, लोकप्रिय सा.बीड सिटी लाईफला शुभेच्छा दिल्या.

तसेच जलद गतीने आपल्या सा.बीड सिटी लाईफ वृत्तपत्राच्या बातम्या आमच्यापर्यंत पोहचतात, आम्ही आवर्जून वाचतो आणि वाचक आहोत. अशा शुभेच्छा धोंडराईच्या विद्यमान सरपंच शितल ताई साखरे यांनी दिल्या. असे विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपापल्या भूमिका सा.बीड सिटी लाईफ परिवारासमोर मांडून शुभेच्छा दिल्या आहेत. आणि त्या भुमिका बीड सिटी लाईफ स्वीकार करून येणाऱ्या काळात त्या भुमिकांची निश्चितपणे अंमलबजावणी केली जाईल. असी ग्वाही बीड सिटी लाईफ ने दिली आहे.

# जागतिक युवा दिनानिमित्त आरोग्य जनजागृती शिबिर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

पंडित जवाहरलाल नेहरु उच्च माध्यमिक विद्यालय आष्टी येथे,ग्रामीण रुग्णालय आष्टी,व राष्ट्रीय सेवा योजना विभाग,पंडित जवाहरलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालय आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य जनजागृती शिबिर संपन्न झाले,या निम्मित प्रमुख पाहुणे,श्री सरोदे साहेब(समपदेशक)यांनी विद्यार्थी विद्यार्थिनी यांना युवा अवस्थे मधील विविध आजार या विषयी चित्र रुपी माहिती दिली,त्यांना सहकार्य,नेलवडे साहेब (प्रयोग शाळा तंद्रज्ञ)यांनी केले,या प्रसंगी प्रा.अच्युत गायकवाड (विभाग प्रमुख) एन.एन.एस.यांनी विद्यार्थी,विद्यार्थिनी यांनी व्यसन , सोशल मीडिया,मोबाईल,या पासून दूर राहून फक्त अभ्यास आणि खेळ या वर लक्ष केंद्रित करावे,आई,वडील,यांचे स्वप्न पूर्ण करावे,अध्यक्षस्थाना वरून उप प्राचार्य प्रा.भवर सर,यांनी,मुलांना व्यायाम,व शिस्त पाळावी तरच जीवनात यशस्वी व्हाल हा मूलमंत्र दिला.या प्रसंगी उपस्थित प्रा.राहुल सोनवणे सर,प्रा.सानप चांगदेव,प्रा.सुरेश फुले,प्रा.जमदाडे सर उपस्थित होते,सूत्रसंचालन देवदत्त साबळे वर्ग ११ वी यांनी केले,तर आभार प्रदर्शन प्रा.निखिल सावंत यांनी केले



# अवैद्य धंदे व जाती जातित तेड निर्माण केल्यास हैयगई नाही-पी.आय.किरण बिडवे



लोकनेता न्यूज नेटवर्क

**शेख जफर । भोकरदन**

भोकरदन तालुक्यातील दानापुर येथे १७ ऑगस्ट रोजी ठीक ११ वजतात भोकरदन पोलिसांच्या वतीने शांतता कमिटीचि बैठक ग्रामपंचयत कार्यालयात सम्पन्न जाली असून या बेठकीला पी आय किरण बिडवे ,यानी आपल्या हद्दित कोनतेहि अवैद्य धंदे खपुन घेतले जानार नाही तसेच जातीय तेड निर्माण करनरयांची गए केली जानार नाही तसेच गावात शांतता ठेवा असे आव्हान पी आय किरण बिडवे यांनी केले आहे या वेळी पी एस आय सहाने, बिट जमादार जधाव , दाडगे यांच्या सह गावातील प्रतिष्ठित नागरिक भगवान दलवी, शेख जफर, तांटामुक्ति अध्यक्ष मस्तान शाह, उप अध्यक्ष राम शिंदे, सुधाकर आढाव, रशीद शेख , सुरेश शिंदे, याच्या सह गावातील नागरिक मोठ्या सांखेने उपस्तित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904